ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# एक निखळ समाजसेविकेची संघर्ष गाथा मांडणारी कलाकृती : मी वनवासी

**डॉ. ल.ना वाघमारे**
*मराठी विभाग,*
*शंकरराव चव्हाण महाविद्यालय,*
*अर्धापूर जि. नांदेड*

*प्रस्तावना:*
*मराठी साहित्य प्रकरातील चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन हा टप्प्या-टप्प्याने विकसित झालेला साहित्य प्रकार आहे. यामध्ये कमी धिक प्रमाणात पुढीलप्रमाणे साम्यभेद आढळतात. चरित्र या प्रकाराच्या अनुषंगाने एखाद्या प्रभावशाली असामान्य कर्तृत्वाविषयी त्याचे अनुयायी लिहितात. त्याचे बालपण, त्याचे कर्तृत्व त्याचे व्यक्तिमत्वाचे पैलू उदाहरणासह सांगून एक व्यक्तिरेखा वाचकांच्या पुढे तो उभा करत असतो. तर आत्मचरित्रात आत्मचरित्रकार आपल्या अंतमर्नातून बाह्य व्यक्तिमत्वाकडे आठवणी आणि अनुभव आयुष्याच्या शेवटी मांडतो. आत्मकथनात आत्मकथनकार ऐन तारुण्यात असताना स्वसह स्वजातीचे दु:ख त्यांच्या वेदना वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न करतो. अनेक घटनांमधून काळाची, मनाची स्वभावाची सामाजिक राजकीय स्थित्यंतरं देखील समजतात आणि आपल्याही नकळत त्या सगळ्या प्रवाहातून या व्यक्तिमत्वांचे अनेक पैलू नव्याने समजल्याने त्यातून आपल्याला प्रेरणा, बोध, मार्गदर्शन आणि कधी-कधी आयुष्याला दिशाही मिळते.*

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वाणीतून आणि त्यांनी उभारलेल्या क्रांतिकारक चळवळीतून प्रेरणा घेऊन मराठी साहित्य क्षितीजावर दलित साहित्याच्या रुपाने नवी पहाट उगवली. मानवाचे माणूसपण नाकारणाऱ्या संस्कृती समाजाविरुध्द दलित मते बंड करुन उठली. हजारो वर्षांच्या दु:ख, दैन्य त्यातून अविष्कृत केले. प्रबोधने, परिवर्तन घडविण्याच्या सुप्त हेतूने दलित आत्मकथने लिहिली. स्त्रियांच्या आत्मकथनामधली बाई एक लढाऊ समज घेऊन आलेली दिसते. ही समज तिच्या सभोवतालच्या जगण्याच्या संघार्षातून तयार होते. तिच्या जातीच्या बरोबर जात्यांताशिवाय दु:खांत नाही. मनुष्य जीवनात जगता येणार नाही. सर्वच स्त्रियांचे लिखाण एक क्रांतिकारी उर्जेने भरलेले आहे. 'मी वनवासी' हे आत्मकथन 16-10-1988 मध्ये रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आले. आत्मकथनकार सिंधूताई सकपाळ ह्या अत्यंत दुर्गम भागात वास्तव्य करणाऱ्या लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या. त्या आदिवासी आणि दीनदुबळ्या गवळी बांधवांसाठी लढा देतात, त्या लढा जिंकतात, परंतु तिथूनच त्यांच्या नवीन संघर्षाला आरंभ होतो. गरिबाचं वीस ट्रक शेणखत फॉरेस्ट खाते लिलाव करते आणि त्यांना साधी शेण गोळा करण्याची मजुरीही मिळत नाही. त्यांच्या या हक्कासाठी सिंधुताई सकपाळ लढा देतात. त्यांच्या या लढ्यामुळे दमडाजींना असटकरना फॉरेस्ट खात्याने दिलेल्या शेतीची फाळणी होऊन शेतीचे तुकडे केले जातात. आदिवासींना वाटले जातात. या लढ्याचा परिणाम सिंधूताईंच्या कौटुंबिक जीवनावर होऊन त्यांना निराधार व्हावे लागते. तिथूनच त्यांच्या जीवनसंघर्षाला सुरुवात होते.

**शोधनिबंधचाची उद्दिष्टये :**

- 'मी वनवासी' मधील लेखिकेच्या सेवावृत्तीचा शोध घेणे.
- सेवावृत्ती आणि साहित्यकृती यातील अनुबंध वस्तुनिष्ठपणे शोधने.

**गृहितके :**

- सिंधूताई सकपाळ यांचा लढा आदिवासींना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी आहे.
- 'मी वनवासी' ही साहित्यकृती एका सक्षम महिलेचे चित्रण करते.

**साधनसामुग्री :**
'मी वनवासी' (आत्मकथन) संदर्भग्रंथ, इंटरनेट, मासिक, इत्यादी सामुग्रीचा उपयोग करणे.

सिंधूताई सकपाळ यांच्या जन्म आर्वी रोडला पिंपरी (मेघे) जि. वर्धा येथे झाला. वयाच्या नवव्या वर्षी पिंपरी (मेघे) येथे प्राथमिक शाळेत पहिल्या वर्गात शिकायला सुरुवात केली. त्यात आईने विरोध केला, परंतु अशिक्षित असणाऱ्या वडिलांनी मात्र आशीर्वादच दिला. अभिमानजी साठे हे सिंधुताई सकपाळ यांचे वडील. वयाच्या बाराव्या वर्षी गोपुरी या केंद्रावर मराठी चौथीची परीक्षा दिली. काही दिवसातच हात जोडून लग्नाला उभ्या राहिल्या. आता मात्र कु. चिंधी अभिमानजी साठे न राहता सौ. चिंधाबाई श्रीहरी सपकाळ झाल्या होत्या. नवरगाव (फॉरेस्ट) हे यांचे सासर. पुढे वयाच्या बाराव्या वर्षी लग्नं, चौदाव्या वर्षी पहिला मुलगा.

दोन-दोन वर्षांच्या फरकाने तीन मुलांना जन्म दिला. मुलीचा गर्भ पोटात असतांना वयाच्या 22 व्या वर्षी संसारातून त्या मुक्त झाल्या. दमडाजी ही इरसाल व्यक्तिरेखा. आदिवसींच्या जमिनी हडप करुन त्यांचे प्रचंड शोषण करते. गरीबांच्या वीस ट्रक शेणखताचा लिलाव फॉरेस्ट खाते करते. परंतु त्यांना शेण गोळा केल्याची मजुरीही मिळत नाही. या विरोधात लेखिका बंड पुकारतात. लढा जिंकतात. त्यामुळे दमडाजीच्या शेतीची फोळणी करुन शेतीचे तुकडे करुन आदिवसांना वाटले जातात. त्यामुळे दमडाजी इरेस पेटतो लेखिकेचा सूड घेण्यासाठी त्यांच्या पतीच्या कानात बोलतो ,

*" तिला जे दिवस गेले आहेत ते माझ्याकडून !"*

दमडाजीच्या या एका वाक्याने लेखिकेच्या पतीचे मन शंकेने दुषित होते. अशाही परिस्थितीमध्ये लेखिका एकावर एक तीन भांडी घरी आणत असतांत. इथे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. त्यावेळी पती ओरडतो,

*"खबरदार, माझ्या दारात पाय देशील तर कुलटा बदमाश, हेच धंदे आहेत तुझे. आपलं स्वत:चं पाप झाकावं म्हणून गरिबांचा कैवार घेतेस. जणू मी त्या गावाचीच नाही. म्हणून दमडाजी आसटकरांची जमीन घालवतेस आणि अंधारात त्याच्याशी प्रेमाचे चाळे करतेस. पापिंणी, तुझ्या पोटात असलेला गर्भ माझा नाही. तो त्याचा आहे हे मला आज कळाले."*

लेखिकेचा शारीरिक आणि मानसिक छेळ त्यांच्या पलीकडून होतो. गाईच्या गोठ्यात त्याही परिस्थितीमध्ये त्यांना ठेवले जाते. त्यांची डिलेवरी होते. तेव्हा त्या ओढयावर जाऊन अगदी गार पाण्याने त्या बाळाला अंघोळ घालतात. स्वच्छ धुतात. ओली बाळंतीन असतांनाही त्यांच्या पोटात अन्नाचा कणही नसतो. समाजही त्यांची काहीच चूक नसतांना त्यांचा धिक्कार करतो. त्या एका म्हातारीला शिळंपातं अन्न मागतात तेव्हा ती म्हणते,

*"तू बेशरम आहेस ...... तुझ्या ठिकाणी मी असते तर कधीच मरुन गेले असते."*

पोटाची आग शमविण्यासाठी त्यांना एक कुत्र्याने आणलेल्या मैदयाच्या पुडीतील पीठाचे रिपर करुन खावे लागते. त्यांचा पती एका ट्रकवाल्याला पन्नास रुपये देऊन गावात भिकारीन आली म्हणुन दुसरीकडे तिला गावातून सोडण्यास सांगतो. आपल्याकडे माहेराचे आणि माहेरच्या लोकांचे खूप कौतुक लोकगीतांतून केलेले दिसून येते. म्हणून आपल्याला माहेरचे लोक तरी जवळ करतील ही लेखिकेची अपेक्षा असते. त्या माहेरकडे निघतात. आपली आई आपल्याला घरी घेऊन जाईल खायाला देईल ही भाबडी आशा असते. जेव्हा प्रत्यक्षात आईची भेट होते. तेव्हा आईच उद्‌गारते,

"बाई गं, तू कुठेही जा वाटल्यास रेल्वे लाईनवर जाऊन मर, मात्र माझ्याकडे येऊ नकोस कारण तुझा नवरा तुला झालेली मुलगी माझी नाही म्हणतो म्हणून"

शेवटी सरकारी दवाखान्यात लेखिकेला आश्रय मिळातो. तेथील नर्स यांच्या जवळचे शीळे अन्न फेकून देऊन साडेचार पोळ्या आणि भेंडीची भाजी खाऊ घालते. सोळा दिवस दवाखान्यात त्या राहतात. पुढे त्यांना भीक मागण्याशिवाय पर्याय नसतो. एका मंदिरासमोर फडक टाकून मुलीला त्यावर टाकतात. आणि त्या गाणे म्हणतात. त्यावेळी त्यांना अडिच रुपये जमतात. त्यांच्य आयुष्यातील पहिली भीक.

सिंधूताई सपकाळ यांचे सामाजिक कार्य

भारतीय शासन दरबारी अनेक नवनवीन प्रोजेक्ट निर्मिती संबंधी देशाविकासाच्या नावावर अनेक निर्णय घेतले जातात, परंतु त्याचा परिणाम गोरगरिब, आदिवासी तथा भटक्यांच्या जीवनव्यव्सथेवर काय होतोय. याचा तसूभरही विचार केला जात नाही. असाच वर्धा परिसरातील टायगर प्रोजेक्ट हा आहे. या प्रोजेक्टच्या नावाखाली वनात रहिवासी असलेल्या आदिवासींना गाई, गुरांसह हाकलत असतांना ते हलण्यास तयार नव्हते. तेव्हा टायगर प्रोजेक्टचे लोक अमानुष वागणूक देत होते. या वस्तुस्थिती संबंधी सिंधूताई लिहितात.

"गाव लवादा येथील गरिबाजी येवले (गवळी) हा आमचा गरिबा ....... तानाजी मालुसरे कट मिशा ठेवायचा टायगर प्रोटेक्ट ऑफिसरने या गरिबाजीला जंगलात गाढून कुठेही न मारता दोन्हीही ओठवरील मिशा कचाकच उपटल्या. मिशी हाताने वर उचलून बघितली जेव्हा हा गरीब डोक्यात पाणी आणून आपली अवस्था सांगायचा तेव्हा या गरीब गवळयाची कीवे करु की त्या ऑफिसरची नरडी फोडू असं वाटयचं "

त्यावेळी सिंधुताई या गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी शपथ घेतात. सिंधुताईंची समाज सेवेचीवृत्ती असल्याने त्यांना गरीबांवर होत असलेला अन्याय सहन होत नाही. आरंभीच्या काळातही गरीब आदिवासींना शेण गोळा करण्याची मजूरीही दिली जात नव्हती. त्यावेळी स्वत:ची पर्वा न करता गुलामी व्यवस्थेविरोध बंड पुकारुन त्यांनी आदिवासींना जमिनी मिळवून दिल्या. स्वत:चे कुटुंब देशोधडीला लागले तरी त्याची त्यांनी पर्वा केली नाही. सिंधूताई अनेक अनाथांची माय झाली. त्यांना कामानिमित्त भेटलेली प्रभा आपली व्यथा मांडतांना म्हणते,

"ताई, याच माझ्या सख्या मामाने मला जाणूनबुजून कुमारिका ठेवले, कारण त्यालाच मी हवी होते म्हणूनच

याच माझ्या मामांनी घरात कुणी नस्तांना दोन वेळा माझ्यावर बलात्कार करायचा प्रयत्न केला. आज सुध्दा दुहेरी फायदा बघतो आहे. एक फायदा भाचीच लग्न केल हा आणि पाच हजार खिशात टाकले की, रस्ता सोपा सरळ आणि दुसरा फायदा त्याला माझ्या शरीरराचे वेळोवेळी लचके तोडता येतील हा, कारण उद्याच्या माझ्या अनेक गिऱ्हाईकांपैकी मामा हेच पहिलं हक्काचं गिऱ्हाईक असेल.

आयुष्यातुन उठणाऱ्या प्रभाचं जीवन सिंधूताई समृध्द करतात. प्रभासाराख्या अनेक अनाथांना त्या मायेची ऊब दिल्याचे जाणवते.

**निष्कर्ष :**

- सामाजिक कार्य आणि लेखनातून सिंधूताई सपकाळ पारदर्शकपणे मार्गक्रमण करतांना दिसतात.
- आत्मकथनातून ऐन उमेदीच्या काळातील अनुभव शब्दबध होतो. याचे प्रत्यंतर ‘ मी वनवासी मधून येते.
- सिंधूताईंचे सामाजिक कार्य अनाथांना मायेची ऊब देत.
- हजारो अनाथांना सिंधूताईंनी सजग जिवन दिले.
- अगदी वयाच्या पंचवीशीत कौटुंबिक कलहामुळे संसारातून त्यांना मुक्त व्हावे लागले.

**संदर्भ ग्रंथ :**

- सपकाळ सिंधूताई ‘मी वनवासी’, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर
- इंटरनेट
- मासिके
- वर्तमानपत्र